# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड
# Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६९ ४१७२, २२६९ ६९१९, २२६९ ४०४१

**Whatsapp No. :** 97699 28894 • **Email :** mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

सभासद बंधू आणि भगीनींनो.

आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र शासनाच्या दि.१४.१०.२०२४ च्या अध्यादेश क्र. **Mah.ordXII of 2024** नुसार सर्व प्रकारच्या करारपत्रावर करण्यांत येणाऱ्या मुद्रांक शुल्कामध्ये वाढ केल्यामुळे सोसायटीच्या सभासदांना वितरीत करण्यांत येणाऱ्या **हमीनिधी व तात्काळ** कर्जाच्या अर्जाची किंमत रु.५५०.०० इतकी करण्यांत आलेली आहे. तसेच मुंबई बाहेरील सभासदांना वितरण करण्यांत येणाऱ्या सदर कर्जाच्या अर्जासाठी रु.५९०.०० इतकी रक्कम आकारण्यांत येईल. सदर रक्कम मनीऑर्डर किवा सोसायटीच्या स्टेट बँकेच्या खाती जमा केल्यानंतरच अर्ज पाठविण्यांत येतील.

**कर्ज अर्ज किंमत :**

| | |
|---|---|
| मुद्रांक शुल्क | रु. ५००.०० |
| मुद्रांक सेवा कर | रु. ३०.०० |
| अर्ज किंमत | रु. १०.०० |
| जी.एस.टि. / सी.जी.एस.टि. | रु. १०.०० |
| **एकूण किंमत** | **रू. ५५०.००** |

**(कर्ज अर्ज स्पीड पोस्टव्दारे मागविल्यास)**

| | |
|---|---|
| मुद्रांक शुल्क | रु. ५००.०० |
| मुद्रांक सेवा कर | रु. ३०.०० |
| अर्ज किंमत | रु. १०.०० |
| जी.एस.टि. / सी.जी.एस.टि. | रु. १०.०० |
| टपाल खर्च | रु. ४०.०० |
| **एकूण किंमत** | **रू. ५९०.००** |

| | |
|---|---|
| Bank Name | State Bank of India |
| Branch Name | Fort Market |
| IFSC Code | SBIN0005347 |
| ACCOUNT NO. | 35603139869 |
| Mob No. | 9769928894 |
| e-mail.id | mumbaipostsociety@gmail.com |

**सर्व सभासदांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!!**

**महेश डी.सावंत**
**मानद सचिव**
**संचालक मंडळाच्या वतीने**

मुंबई दि. २१.१०.२०२४

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड
## Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६१ ४१७२, २२६१ ६११९, २२६१ ४०४१

Whatsapp No. : 97699 28894 • Email : mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

प्रिय सभासद बंधू आणि भगिनींनो,

सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संचालक मंडळाच्या दि. २३/०३/२०२४ रोजीच्या सभेच्या मंजूरीनंतर दि. ०१.०४.२०२४ पासून हमीनिधी कर्ज सुरक्षा नियमावली सर्व नविन व जुन्या कर्जदार सभासदांना लागू करण्यात येत आहे.

<u>हमी निधी कर्ज सुरक्षा योजना नियमावली</u>

१) सदर हमी निधी कर्ज सुरक्षा योजना, अपर निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या दि. २९.०९.२०१६ च्या मंजूरी पत्रानुसार सुरू करण्यात येत आहे.

२) या सुरक्षा योजनेचा हप्ता दरमहा रू. ४२/- अधिक GST वस्तू सेवाकर प्रति रू. १,००,०००/- (एक लाख फक्त) याप्रमाणे घेतल्या जाणाऱ्या कर्जाच्या पटीत आकारला जाईल तसेच कर्ज रू. १,००,०००/- एक लाखाच्या पटीत कमी होईल. त्या प्रमाणे कर्ज सुरक्षा योजनेचा हप्ता कमी कमी होत जाईल. वेळोवेळी कर्ज सुरक्षा हप्त्याची रक्कम कमी जास्त करण्याचे अधिकार संचालक मंडळाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

३) सभासदास सेवानिवृत्तीच्या तीन महिने आधी पर्यंतच दरमहा नियमितपणे मासिक कर्जाचा हप्ता, कर्ज सुरक्षा हप्त्यासहित जमा करणे बंधनकारक असेल.

४) हमी निधी कर्ज घेतल्यापासून सलग ३ महिने कर्ज सुरक्षा योजनेचे हप्ते येणे बंधनकारक आहे. जर सभासद सलग ३ **महिने** हप्ते भरण्यास अपात्र ठरला तर सभासद सदर योजनेस पात्र ठरणार नाही.

५) सभासदाच्या मृत्यूच्या तारखेपर्यंत नियमित कर्ज वसुलीचा हप्ता भरणाऱ्या सभासदाचे उर्वरित शिल्लक हमी निधी कर्ज निर्लेखित करण्यात येईल तसेच सभासदाची सोसायटीकडे जमा असलेली सर्व रक्कम परत करण्यात येईल.

६) अनियमित सभासद म्हणजे, पहिले तीन हप्ते नियमित भरल्यानंतरसुध्दा संपूर्ण कर्ज फेडीच्या कालावधीत एक हप्ता जरी अनियमित असेल उदा. हमीनिधी व बचतफंड कर्जाचा हप्ता, सुरक्षा हप्ता, कर्जा वरील व्याज व सभासद वर्गणी जमा केली नसेल तर सभासदाला कर्ज सुरक्षा योजनेत अनियमित ठरविण्यात येईल. अशा अनियमित सभासदांची त्यांच्या शिल्लक कर्जाची फक्त ५०% (पन्नास टक्के) रक्कम माफ करण्यात येईल उर्वरीत कर्जाची रक्कम सभासदाला खात्याकडून मिळणाऱ्या रकमेतून वसुली करण्यात येईल अनियमित सभासदांना सोसायटीतील जमा रक्कम परत मिळणार नाही. ती रक्कम उर्वरित कर्ज रकमेत वळती केली जाईल.

७) ह्या सुरक्षा योजनेचा लाभ जो सभासद सेवेत आहे तो पर्यंतच घेता येईल व या योजनेस पात्र असेल. स्वेच्छानिवृत्ती आणि सेवाकाल पुर्ण होऊन निवृत्त झालेल्या सभासदास या योजनेचा लाभ घेता येणार नाही. तसेच सभासदाने आत्महत्या केल्यास सदर सभासदास या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

९) जे सभासद कर्ज घेतलेल्या महिन्यापासून कर्ज परतफेडीचा एकही हप्ता नियमित भरला नसल्यास सदर सभासदास उपरोक्त योजनेचा लाभ घेता येणार नाही. असे अनियमित सभासद सेवेत असतांना मृत्यु पावल्यास त्यांच्या कर्जाची संपूर्ण रक्कम त्याच्या मृत्यु पश्चात मिळणाऱ्या डीसीआरजी व खात्याकडून मिळणाऱ्या इतर रकमेतून वसुल केली जाईल.

१०) सभासदाच्या मृत्यू पश्चात त्याच्या अधिकृत वारसाने अर्जासोबत खालील कागदपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

अ) अधिकृत वारसाचा अर्ज

ब) अधिकृत वारस असल्याचा पुरावा व बँक खात्याचा तपशील

क) सभासदाच्या मृत्यूचे मूळ प्रमाणपत्र (Death Certificate)

ड) सभासदाच्या खात्याच्या सेवेत असतांना मृत्यू पावल्याचा (Expired While in Service) चा मूळ दाखला

ई) सभासद व वारस या दोघांचे आधार कार्ड, पॅन कार्ड.

११) वरील नियमांमध्ये बदल करण्याचे अधिकार संचालक मंडळ स्वतःकडे राखून ठेवत आहे.

| राजेश पी. सारंग | गुरुदत्त डी. आळवे | महेश डी. सावंत | सदानंद के. राणे |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | मानद सचिव | मानद खजिनदार |

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड
# Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.
दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६१ ४१७२, २२६१ ६११९, २२६१ ४०४१
Whatsapp No. : 97699 28894 • Email : mumbaipostsociety@gmail.com
जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

सभासद बंधू आणि भगिनींनो,

आपणांस कळविण्यात येते की सोसायटीच्या सभासदांकरीता व सेवानिवृत्त सभासदांकरीता कामगार दिनाचे औचित्य साधून १ मे २०२४ पासून फक्त चार महिन्याच्या कालावधीसाठी अमृत मुदत ठेव योजना सूरू करण्यात येणार आहे. तरी सर्व सभासदांनी या योजनेचा लाभ घ्यावा

## "अमृत मुदत ठेव योजना"

**ठेव स्विकारण्याचा कालावधी :** दि. ०१ मे २०२४ पासून दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत

सदर अमृत ठेव योजना दि. ०१ मे २०२४ पासून दि. ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये :-**

१. ठेवीचा कालावधी - ३६ महिने
२. व्याजाचा दर - ८.७५% (चक्रवाढव्याज पध्दतीने)
३. ठेव रक्कम - रु. १०,०००/- किंवा रु. १०,००० च्या पटीमध्ये

| ८.७५% चक्रवाढ पध्दतीने वार्षिक व्याज | | | |
|---|---|---|---|
| **महिने** | **मुद्दल** | **व्याज** | **शिल्लक रक्कम** |
| १२ | १०,००० | ८७५ | १०,८७५ |
| २४ | १०,८७५ | ९५२ | ११,८२७ |
| ३६ | ११,८२७ | १०३५ | १२,८६२ |

४. ठेवीची रक्कम धनादेशाव्दारे किंवा एनईएफटि / आरटीजीएस व्दारे स्विकारण्यात येईल.
५. ठेवीवरील व्याज वार्षिक पध्दतीने गणले जाईल व व्याज मुदतठेव रकमेसहित देण्यात येईल.
६. मुदतीपूर्वी रक्कम काढल्यास सरळव्याज पध्दतीने खालीलप्रमाणे व्याज देण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| **११ महिन्यांपर्यंत** | - | **व्याज नाही** |
| **११ महिन्यांच्या पुढे ते २४ महिन्यांपर्यंत** | - | **५.५०%** |
| **२४ महिन्यांच्या पुढे ते ३६ महिन्यांपर्यंत** | - | **६.५०%** |
| **मुदत पूर्ण झाल्यानंतर** | - | **८.७५%** |

७. अमृत मुदतठेव योजनेत मुदत संपल्यानंतर मिळणाऱ्या व्याजावर आयकराच्या नियमामुसार TDS आकारण्यात येईल.
८. नामनिर्देशन - सभासदाला योजनेत सहभागी होताना वारसाचे नामनिर्देशन करावे लागेल.
९. या योजनेअंतर्गत वेळोवळी बदल करण्याचे अधिकार संचालक मंडळ राखून ठेवत आहे.

| **राजेश पी. सारंग** | **गुरुदत्त डी. आळवे** | **महेश डी सावंत** | **सदानंद के. राणे** |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | मानद सचिव | मानद खजिनदार |

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड
# Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६१ ४१७२, २२६१ ६९१९, २२६१ ४०४१
Whatsapp No. : 97699 28894 • Email : mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.

**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

**सभासद बंधू आणि भगिनींनो,**

आपणांस कळविण्यात येते की, शनिवार दि. २३/०३/२०२४ रोजी संपन्न झालेल्या सोसायटीच्या संचालक मंडळाच्या सभेत सर्वानुमते मंजूर केलेल्या ठरावानुसार मुदतठेवीवरील व्याज दरात वाढ करण्यात आलेली आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे त्याची अंमलबजावणी दि. ०१/०४/२०२४ पासून करण्यात येईल.

१. मुदतठेवीवरील व्याज दर २४ महिन्यांसाठी द.सा.द.शे. ८.३५%

अ. मुदत ठेवीचा कालावधी २४ महिन्यांचा असेल.

ब. मुदत ठेव योजनेत रक्कम गुंतविल्यानंतर १२ महिन्याच्या आत रक्कम परत घेतल्यास द.सा.द.शे. ४.००% दराने व्याज देण्यात येईल.

क. १३ व्या महिन्यानंतर मुदत ठेवीची मुदत पूर्ण व्हावयाच्या आधी रक्कम परत घेतल्यास द.सा.द.शे. ६.००% दराने व्याज देण्यात येईल.

ड. मुदत ठेवीचा २४ महिन्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर नंतरच्या कालावधीसाठी व त्यापुढील कालावधीसाठी द.सा.द.शे. ८.३५% दराने व्याज देण्यात येईल.

ई. मुदत ठेवीसाठी असलेली २४ महिन्याची मुदत पूर्ण झाल्यानंतर सदर मुदत ठेवीचे नुतनीकरण करण्याची आवश्यकता नाही. सदर मुदतठेवी स्वयं नुतनीकरण सोसायटीमार्फत करण्यात येईल.

२. काही कर्मचारी सोसायटीचे सभासदत्व स्विकारून महाराष्ट्राबाहेर जातात. संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरतेच मर्यादित असल्याने अशा सभासदांनी बदलीबाबतच्या सूचना त्वरीत सोसायटीच्या ई मेल आयडी (mumbaipostsociety@gmail.com) वर सोसायटी कार्यालयाला द्याव्यात व अशा सभासदांना संस्थेच्या पोटनियमातील तरतूदीनुसार सोसायटीची संपूर्ण कर्ज वसुली परतफेड करणे आवश्यक आहे.

३. सहकार खात्याच्या नियमानुसार सभासदाने कर्ज एकाच संस्थेकडून घेणे आवश्यक आहे परंतू असे आढळून येत आहे कि, काही सभासदांनी २ ते ३ सोसायट्यांचे सभासदत्व स्विकारल्याने व कर्ज घेतल्याने त्यांची कर्ज वसुली त्यांच्या पगारातून होण्यास अडचण निर्माण होत आहे त्यामुळे सर्व सभासदांनी वरील नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सर्व सभासदांनी सोसायटीची नियमित वसुली त्यांच्या वेतनातूनच भरणे अनिवार्य आहे. बाहेरून वसुली भरणे टाळावे. सभासदांनी कर्ज वसुली नियमित भरावी व थकबाकी टाळून विनाविलंब सुलभतेने कर्ज मिळवावे.

आपला सहकारी
महेश डी. सावंत
मानद सचिव
संचालक मंडळाच्या वतीने

मुंबई दि. १०.०४.२०२४

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड
# Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६१ ४१७२, २२६१ ६११९, २२६१ ४०४१

**Whatsapp No. :** 97699 28894 • **Email :** mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

**सभासद बंधू आणि भगिनींनो,**

आपणांस कळविण्यात येते की, बुधवार दि. २०.१२.२०२३ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या सभेच्या निर्णयानुसार दि. ०१ जानेवारी २०२४ पासून हमी निधी कर्जाचा व्याज दर द.सा.द.शे. ९.३०% वरून द.सा.द.शे. ९.६०% करण्यात येत आहे. तसेच, मुदत ठेवीवरील व्याजदर द.सा.द.शे. ८.२५% इतका असेल,

१. जे सभासद बदली होतात त्यांनी त्याबद्दलची माहिती त्वरीत कार्यालय प्रमुखांनी व सभासदाने सोसायटी कार्यालयास कळवावी जेणेकरून अशा सभासदांची वसुली त्या संबंधित कार्यालयास दाखविणे सोयीचे होईल.

२. काही सभासद इतर सोसायटीचे सभासद असतात त्यांनी सोसायटी कडून कर्ज घेताना त्या **"सोसायटीचा कर्ज नसल्याचा दाखला"** व मागील तीन महिन्याच्या वेतनाच्या पावत्या (Salary Slip) कर्जाच्या अर्जासोबत जोडाव्यात.

३. काही कर्मचारी सोसायटीचे सभासदत्व स्विकारून महाराष्ट्राबाहेर जातात. संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्रापुरतेच मर्यादित असल्याने अशा सभासदांनी बदलीबाबतच्या सूचना त्वरीत सोसायटीच्या ई मेल आयडी (mumbaipostsociety@gmail.com) वर सोसायटी कार्यालयाला द्याव्यात व अशा सभासदांना संस्थेच्या पोटनियमातील तरतूदीनुसार सोसायटीची संपूर्ण कर्ज वसुली परतफेड करणे आवश्यक आहे.

४. सहकार खात्याच्या नियमानुसार सभासदाने कर्ज एकाच संस्थेकडून घेणे आवश्यक आहे परंतू असे आढळून येत आहे कि, काही सभासदांनी २ ते ३ सोसायट्यांचे सभासदत्व स्विकारल्याने व कर्ज घेतल्याने त्यांची कर्ज वसुली त्यांच्या पागारातून होण्यास अडचण निर्माण होत आहे त्यामुळे सर्व सभासदांनी वरील नियमांचे काटेकोरपणे पालण करावे.

५. सर्व सभासदांनी सोसायटीची नियमित वसुली त्यांच्या वेतनातूनच भरणे अनिवार्य आहे. बाहेरून वसुली भरणे टाळावे. सभासदांनी कर्ज वसुली नियमित भरावी व थकबाकी टाळून विनाविलंब सुलभतेने कर्ज मिळवावे.

**नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !!**

आपला सहकारी
महेश डी. सावंत
मानद सचिव
संचालक मंडळाच्या वतीने

मुंबई दि. २०.१२.२०२३

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड
## Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.

दूरध्वनी क्र. : २२६२ ०४१३, २२६१ ४१७२, २२६१ ६११९, २२६१ ४०४१

Whatsapp No. : 97699 28894 • Email : mumbaipostsociety@gmail.com

जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.


**कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.**

**सभासद बंधू आणि भगिनींनो**

**सभासद हमीनिधी कर्ज मर्यादा**

दि. २०.०६.२०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेच्या निर्णयानुसार सभासदांना दि. ०१.०७.२०२४ पासून कर्ज मंजूर करताना कर्ज वितरण मर्यादेमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात आलेले आहेत.

१. सभासद झाल्यापासून ६ महिने नियमित वर्गणी वसुली जमा झाल्यास रू. ५,००,०००/- इतके.

२. सभासद झाल्यापासून १२ महिने नियमित वर्गणी वसुली जमा झाल्यास रू. १०,००,०००/-

३. सभासद झाल्यापासून २ वर्षानंतर रू. १२,००,०००/- इतके.

४. सभासद झाल्यापासून ३ वर्षानंतर रू. १४,००,०००/- इतके.

५. सभासद झाल्यापासून ४ वर्षानंतर रू. १६,००,०००/- इतके.

६. सभासद झाल्यापासून ५ वर्षानंतर रू. १८,००,०००/- इतके.

७. ६ वर्षापेक्षा जास्त काळ सभासदत्व असेल त्यांना रू. २०,००,०००/- इतके.

**तसेच दि. ०१.०७.२०२४ पासून हमीनिधी कर्ज मंजूर करताना सभासदाने घेतलेल्या हमीनिधी कर्जाच्या १० हफ्त्यांची नियमितपणे परतफेड केल्यानंतरच पुनःश्च हमीनिधी कर्जास पात्र होईल व संस्थेने सभासदत्व स्विकारल्यानंतर सहा महिने हमीनिधी कर्ज मिळणार नाही याची नोंद घ्यावी व सहकार्य करावे.**

**आपले नम्र**

| | | | |
|---|---|---|---|
| **राजेश पी. सारंग** | **गुरुदत्त डी. आळवे** | **महेश डी सावंत** | **सदानंद के. राणे** |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | मानद सचिव | मानद खजिनदार |

**मुंबई**

**दिनांक : २०/०६/२०२४**

मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड
Mumbai Postal Employees Co-operative Credit Society Ltd.
दूरध्वनी क्र. : २२६२०४१३, २२६९४१७२, २२६९६९१९, २२६९४०४१
Whatsapp No. : 97699 28894 • Email : mumbaipostsociety@gmail.com
जी. पी. ओ. इमारत, तळ मजला, मुंबई - ४०० ००१. / G. P. O. Building, Ground Floor, Mumbai - 400 001.

कृपया सदर पत्रक सभासदांच्या माहितीकरीता
कार्यालयाच्या सूचना फलकावर लावावे.

सभासद बंधू आणि भगिनींनो,

आपणांस माहित आहेच की सन १९९४ - ९५ या शैक्षणिक वर्षापासून विविध परीक्षांमध्ये प्राविण्य मिळविणारे सभासद तसेच त्यांच्या पाल्यांना सोसायटीच्या वतीने पारितोषिक देण्यास सुरूवात केली आहे.

सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षासाठी खालील अटी पूर्ण करणाऱ्या सभासदांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र परिमंडळातील शैक्षणिक संस्थेतून शिक्षण / सरकारी परिमंडळातील परीक्षा केंद्रातून शिक्षण घेतलेले सभासद अथवा पाल्य सदर अर्ज करू शकतात.

२) अ) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (१०वी) च्या परीक्षेत किमान ७०% अथवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेले विद्यार्थी असावेत.
   ब) उच्च माध्यमिक (१२वी) च्या परीक्षेत किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत.
   क) पदवी (सर्व शाखा) परिक्षेत किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत.
   ड) पदव्युत्तर (सर्व शाखा) परीक्षेत किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत.
   इ) डिप्लोमा कोर्सेस किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत.
   फ) डिग्री कोर्सेस किमान ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असावेत.

३) पारितोषिकांची रक्कम पुढील प्रमाणे असेल :-

| | | |
|---|---|---|
| अ) | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१०वी) | रू. १५००/- |
| ब) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (१२वी) डिप्लोमा १० वी नंतर | रू. १७००/- |
| क) | पदवी परीक्षा (सर्व शाखा) डिप्लोमा १२ वी नंतर | रू. २०००/- |
| ड) | पदव्युत्तर परीक्षा (सर्व शाखा) | रू. २२००/- |
| इ) | उच्च शिक्षित | रू. २५००/- |

४) अर्जासोबत गुणपत्रिकेची व प्रमाणपत्राची, शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने अथवा कार्यालय प्रमुखाने सही शिक्यानिशी (Attested) साक्षांकित केलेली छायांकित प्रत (Xerox Copy) जोडली पाहिजे.

५) पदविका अथवा पदवी (Diploma & Degree Courses) च्या प्रत्येक वर्षाच्या Final पर्यंतची Certificate जोडणे आवश्यक आहे.

६) उच्चशिक्षित पाल्यांचा पासपोर्ट साईज फोटो अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.

७) वरील सर्व अटी पूर्ण करणाऱ्या अर्जदारांनी त्यांचे अर्ज श्री. महेश डी. सावंत मानद सचिव, मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई - ४०० ००१. च्या नावे बंद लिफाफ्यातून अथवा प्रत्यक्ष शनिवार दि. ३०/०९/२०२४ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत) पोहोचतील अशा रितीने पाठवावेत, "लिफाफ्यावर शैक्षणिक पारितोषिकांसाठी अर्ज" असे स्पष्टपणे नमुद करावे, दिनांक ३०/०९/२०२४ पर्यंत आलेल्या अर्जांचाच विचार करण्यात येईल. त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

८) अर्जाचे छापील नमुने सोसायटी कार्यालयात उपलब्ध आहेत. सभासदाने अर्जाची मागणी पोस्टाद्वारे केल्यास ते पोस्टाद्वारे पाठविण्यात येतील, तसेच सोसायटीच्या वेब साईट वर देखील अर्ज उपलब्ध आहेत. सोसायटीच्या वेबसाईट वरून आपण हा अर्ज डाऊनलोड करून घेऊ शकता. धन्यवाद !

आपला
**महेश डी. सावंत**
मानद सचिव

**मुंबई**
**दिनांक : २०/०६/२०२४**

# मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

तळमजला, मुंबई जी.पी ओ. इमारत, मुंबई -४०००.०१. रजि. नं. ७२२

फोन. नं. ०२२-२२६२०४१३ / २२६९४१७२ इमेल : mumbaipostsociety@gmail.com

## १०७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मुंबई पोस्टल एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. या संस्थेची १०७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि.४ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ठिक ६.०० वाजता प्राचार्य बी. एन. वैद्य सभागृह, राजा शिवाजी विद्यासंकुल, एल. एन. रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०००१४ येथे संपन्न होणार आहे.

सोसायटीच्या सर्व सभासदांनी ठिक वेळेवर उपस्थित रहावे अशी अगत्यपुर्वक विनंती आहे.

### ---- सभेपुढील विषय ----

१. दि.१२.०९.२०२३ रोजी झालेल्या १०६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मंजूर करणे.

२. दि.३१ मार्च २०२४ अखेरचा संचालक मंडळाचा अहवाल तसेच वैधानिक लेखा परिक्षकांनी तपासलेले ताळेबंद पत्रक नफा -तोटा पत्रक व नफा- तोटा विनियोजन लेखा स्विकारणे आणि त्यास मंजूरी देणे.

३. सोसायटीच्या सभासदांसाठी संस्थेचे नवीन विश्रामगृह घेण्याबाबत विचार विनिमय करणे.

४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२३-२०२४ च्या नफा वाटपास मंजूरी देणे.

५. सन २०२४-२०२५ च्या अंदाज पत्रकाला मंजूरी देणे.

६. सन २०२४-२०२५ करीता वैधानिक लेखा परिक्षक यांची निवड करणे.

७. संचालक मंडळाने सुचविलेल्या ठरावांचा व उप विधीतील दुरूस्त्यांचा विचार करणे व मंजुरी देणे.

८. सन २०२२-२३ च्या दोष दुरूस्ती अहवालास मंजूरी देणे.

९. वार्षिक सर्वसाधारण सभेला अनुपस्थित असलेल्या सभासदांना क्षमापित करणे बाबत.

१०. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

मुंबई
दि: १९ जुलै २०२४

**महेश डी.सावंत**
**मानद सचिव**
संचालक मंडळाच्या वतीने

### : सभेसंबंधी विशेष सूचना :

१) सभेच्या नियोजित वेळेत गणपूर्ती न झाल्यास सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित झालेली सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी वरील कामकाज करण्यासाठी ठिक ६.३० वाजता घेण्यात येईल.

२) वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवालासंबंधी कोणाला प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपले प्रश्न सर्वसाधारण सभेच्या पुरे सात दिवस अगोदर लेखी स्वरुपात द्यावेत.

३) सभासदांना विनंती करण्यात येते कि,सभेला उपस्थित रहाताना सोसायटीचे पासबुक आणणे आवश्यक आहे.

४) क्रियाशील सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजात भाग घेता येईल व अक्रियाशील सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजात भाग घेता येणार नाही.